# 1 मे महाराष्ट्र दिन

## व आंतरराष्ट्रीय कामगार दिन

1 मे हा दिवस महाराष्ट्राच्या निर्मितीचा दिवस आहे. भाषावार राज्यांच्या पुनर्रचनेनुसार एक मे रोजी महाराष्ट्राचा प्रशासकीय कार्यभाग सुरु झाला. स्वातंत्र्यानंतर मध्य भारतातील सर्व मराठी भाषिकांच्या स्थानांचे एकीकरण करुन एक राज्य बनविण्यात आले. यासाठी ठराव करण्यात आला. त्यानुसार कोंकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, खानदेश, व विदर्भ अशा सर्व भागाचा एकत्र असा महाराष्ट्र एक मे 1960 रोजी अस्तित्वात आला व महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यात मुंबई प्रांतात असलेले दमन व गोवा या मधील जिल्हे, हैदराबादच्या निजामाच्या राज्यातील पाच जिल्हे, मध्य प्रांताताच्या दक्षिणे कडील आठ जिल्हे असे छोटे मोठे प्रदेश होते अशा तऱ्हेने महाराष्ट्र राज्य तयार झाले.

21 नोव्हेंबर 1956 रोजी फ्लोरा फाऊंटन परिसरात मराठी भाषिक लोकांचा प्रचंड जन समुदाय जमला होता. कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले होते. त्याचा निषेध करण्यासाठी हा विशाल जनसागर जमला होता. लोक घोषणा देत होते. आपले म्हणणे मांडत होते. पोलीसी ताकदीने मोर्चा उधळून लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रथम लाठीचार्ज झाला. पण लोकांचा निर्धार अटल होता. नंतर गोळीबार झाला. 105 आंदोलक ठार झाले. या बलीदानापुढे सरकारला नमते घ्यावे लागले. व 1 मे 1960 रोजी मुंबई सह महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. 1985 साली ह्या हुतात्म्यांचे स्मारक उभारण्यात आले.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण हे होते.

महाराष्ट्र राज्य हे भारताच्या पश्चिम भागात असून त्याच्या आसपास गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक व गोवा ही राज्ये आहेत. पश्चिमेकडे अरबी समुद्र आहे.

एक मे हा महाराष्ट्र दिन संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सरकारी कार्यालये व सर्व संस्थामध्ये ध्वजारोहण केले जाते. निरनिराळे सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते.

एक मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन आहे. 19 व्या शतकात कामगार आपल्या हक्का करिता लढण्यासाठी समोर आले. पूर्वी कामाचे तास दहा ते सोळा होते अनिश्चितता होती. असुरक्षितता होती. अनेक वेळा काम करीत असतांना कामगारांना दुखापत होत असे प्रसंगी मृत्यु ही येत असे.

अमेरिकेमध्ये सर्वात प्रथम कामगारांनी आंदोलन केले. कामाचे तास 8 तास असावेत तसेच इतर ही मागण्यां साठी शिकागो येथील हेय मार्केट मध्ये सर्व उद्योग धंद्या मधून जवळ जवळ 30000 कामगार एकत्र आले. त्या वेळी तेथे बॉबस्फोट झाला होता. कामगारांना पांगविण्या साठी पोलिसांनी गोळीबार केला त्यात सात मजूर ठार झाले, परंतू नंतर ते आंदोलन यशस्वी झाले. व एक मे 1883 पासून हा दिवस साजरा होऊ लागला. आज ही भारतात सर्व ठिकाणी कामाचे तास 8 तास आहेत.

भारतात एक मे 1923 रोजी चेन्नई येथे कामगार दिन प्रथम साजरा करण्यात आला. त्यावेळी त्याला 'मद्रास दिवस' म्हटले होते. भारतीय मजदूर किसान पार्टीचे नेता कॉमरेड सिंगरावेलू चेटयार यांनी प्रथम सुरू केला. पुढे मद्रास येथील हायकोर्टाच्या समोरच्या चबुतऱ्यावर बसून असा संकल्प करण्यात आला की, संपूर्ण भारतात हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा करण्यात यावा व सुट्टी जाहीर करण्यात यावी.

भारताबाहेर 80 देशात हा कामगार दिन एक मे ला साजरा होतो.

कोणता ही देश, संस्था, उद्योग समुह या ठिकाणी कामगारांचा महत्वाचा सहभाग असतो. या यशासाठी त्यांचे हात, त्यांची बुद्धी, त्यांचे शारिरीक श्रम हेच आधारभूत असतात. प्रत्येक उद्योगात मालक, कामगार, प्रशासन व शासन हेच महत्वपूर्ण घटक असतात. कामगारा शिवाय कोणताही उद्योग उभा राहू शकत नाही.

महात्मा गांधींनी म्हटले आहे, प्रत्येक देशाचीउन्नती त्या देशातील कामगार व शेतकरी यांच्यावर अवलंबून असते. त्यांचा विकास, त्यांची शांतता, व न्यायव्यवस्था व आरोग्य हे अत्यंत महत्वाचे घटक असतात. मालक व मजूर यांचे संबंध सलोख्याचे व पारदर्शी असावेत.त्याची विवरण प्रणाली निश्चित असावी.

गुरु नानकदेव यांनी देखिल मजूर व कामगारांच्या हक्का साठी आवाज उठविला होता. काम करणे, नाम जपणे यासाठी मनसुख पासून गुरमुख पर्यंत यात्रा करण्याचा संदेश त्यांनी दिला होता. सीख लोक एक मे भाई लालो दिवस ही म्हणतात.

आपल्या संस्कृतीत श्रम प्रतिष्ठा हे महत्वाचे मूल्य आहे. लहान असो, मोठा असो, कसेही, कोणतेही काम करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान व्हायलाच हवा. शेतात रात्रंदिवस राबणारा शेतकरी असो, कारखान्यात काम करणारा कामगार असो, संगणकावर बौद्धिक काम करणारा तंत्रज्ञ असो, सफाई काम करणारा मजूर असो, घरात घरकाम करणारी गृहिणी असो प्रत्येकाच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळालीच पाहिजे. कामगार दिन साजरा करण्याचा हाच महत्वाचा संदेश आहे.

जय हिंद जय महाराष्ट्र.

— o —



सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर भाग १
कोथरुड पुणे
9405438939